तात्काळ

शासकीय सेवेत मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या गाऱ्हाण्यांच्या/निवेदनांच्या प्रकरणांवर विना विलंब कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-बीसीसी-१०८६/५७३/१६ब,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक: २ एप्रिल, १९८६.

## शासन परिपत्रक

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०७७/४९८/सोळा, दिनांक १२ ऑक्टोबर १९७७ मधील आदेशान्वये मागासवर्गीयासंबंधी धोरणाची व आदेशांची योग्य रितीने अंमलबजावणी होते किंवा नाही हे पहाण्यासाठी सामान्य प्रशासन विभागामध्ये एक खास मागासवर्ग कक्ष निर्माण करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०७६/११९१/६८५/१६ब, दिनांक ३ मार्च, १९७७ अन्वये मागासवर्गातील कर्मचारी आपली गाऱ्हाणी समाज कल्याण मंत्री, राज्यमंत्री किंवा आदिवासी विकास मंत्री व राज्यमंत्री यांच्याकडे थेट सादर करू शकतात असे निदेश देण्यात आले आहेत. वरील आदेशांच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्षाकडे व मंत्री, राज्यमंत्री समाज कल्याण मंत्री व राज्यमंत्री आदिवासी विकास यांच्याकडे मागासवर्गीय कर्मचारी अनेक निवेदने पाठवितात. सदर अभिवेदनांवर तात्काळ कार्यवाही करून मागासवर्गीय कर्मचाऱ्यांवर भरती व बढती बाबत अन्याय झाला आहे किंवा कसे, या संदर्भात परीक्षण करून संबंधित प्रशासकीय मंत्रालयीन विभागाला योग्य सूचना देणे आवश्यक असते. वरील प्रकारच्या अभिवेदनांच्या संदर्भात प्रथम संबंधित मंत्रालयीन विभाग अथवा संबंधित विभागीय प्रमुख यांचे अभिप्राय मागविण्यात येतात. त्यांचे अभिप्राय उपलब्ध झाल्यानंतर सदर अभिप्राय शासकीय आदेशांप्रमाणे योग्य आहेत किंवा कसे हे तपासून या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येते. परंतु शासनास असे आढळून आले आहे की, मागासवर्ग कक्षाकडून मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक गाऱ्हाण्यांच्या संदर्भात मागविण्यात आलेले अभिप्राय उच्चस्तरावर स्मरणपत्रे पाठवूनही संबंधित मंत्रालयीन विभाग व संबंधित विभागीय प्रमुखे यांचेकडून योग्य कालावधीत उपलब्ध होत नाहीत. म्हणून अशा प्रकरणांवर निर्णय घेण्यास फारच विलंब होतो व बरीच प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. मागासवर्गीयांच्या सेवेसंबंधी व इतर सवलतीबाबतच्या गाऱ्हाण्यासंबंधीच्या निवेदनांवर / प्रकरणांवर तात्काळ अभिप्राय उपलब्ध झाल्यास, सामान्य प्रशासन विभागामधील मागासवर्ग कक्ष अधिक परिणामकारकरित्या काम करू शकेल व अशा प्रकरणावर विना विलंब निर्णय घेणे शक्य होईल. म्हणून सर्व मंत्रालयीन

कृ. मा. प.

विभाग / विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, मागासवर्ग कक्षाकडून पाठविलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक गाऱ्हाण्याच्या प्रकरणांवर आवश्यक असलेले अभिप्राय व इतर माहिती तातडीने म्हणजे जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीत उपलब्ध करून देण्याबाबत दक्षता घ्यावी. संबंधित अधिकाऱ्याकडून एका महिन्याच्या आत अभिप्राय प्राप्त न झाल्यास त्याबाबत गंभीर दखल घेण्यात येईल.

२. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी वरील आदेशांची काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

३. तसेच, सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील आदेश, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय, निम-शासकीय, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे, सहकारी संस्था इत्यादींच्या नजरेस आणून सदर आदेशांचे कटाक्षाने पालन करण्याबाबतच्या त्यांना योग्य सूचना निर्गमित कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा. गो. देशमुख,
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
x प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
x प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
x प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.

x [पत्राने]

---

एच-४३[४०००-४-८६]-अ.